# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्रमांक - ११९/२०२५ दिनांक १२/०३/२०२५

## प्रेसनोट

**ऑनलाईन फसवणुकीतील रुपये १,८६,०६६/- रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!**

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील काशिमिरा पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री. रमेश विश्वकर्मा यांनी **ऑनलाईन टेलिग्राम टास्क पुर्ण केल्यास अधिक लाभाचे अमिष दाखवुन जास्तीत जास्त नफा कसा मिळवायचा असे सांगुन** तक्रारदार यांनी एकुण ५,२५,०००/- रु.रक्कमेची गुंतवणुक केली. जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे तक्रारदार यांनी एकुण ५,२५,०००/- रु. रक्कमेचा भरणा केला. तक्रारदार यांनी गुंतवणुक केलेल्या रक्कमेचा कोणताही परतावा न मिळाल्याने त्यांची फसवणुक झाल्याबाबत त्यांनी सायबर पोलीस ठाणे येथे दिनांक २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी समक्ष हजर राहून तक्रार दिली त्याबाबत तात्काळ एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रारदार यांचेकडून माहिती प्राप्त करुन ऑनलाईन तक्रार नोंद करण्यात आलेली होती.

**(सायबर पोलीस ठाणे येथे अर्ज आवक क्रमांक २२०६-बी/२०२४, दिनांक २५/१०/२०२४ तक्रारी अर्ज प्राप्त होता.)**

तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज प्राप्त होताच एनसीसीआरपी पोर्टलवर संबंधीत ०३ बँकेसोबत तात्काळ पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची पोर्टलवरील रक्कम थांबविण्याबाबत पाठपुरावा करण्यात आला. त्यामुळे तक्रारदार यांनी फसवणूक रक्कम बँक खात्यामध्ये थांबविण्यात आली होती.

तक्रारदार यांनी त्यांचे बँकेकडून थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळणेबाबत मा. मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय, ठाणे यांचे न्यायालयात रितसर अर्ज दाखल केलेला होता, सदर अर्जाबाबत सायबर पोलीस ठाणे येथून अहवाल सादर करण्यात आला, तसेच मा. न्यायालयाकडून सविस्तर आदेश प्राप्त करण्यात आले.

मा. न्यायालयाकडून आदेश प्राप्त झालेनंतर सलग १ महीना **पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली एकुण १,८६,०६६/- रक्कम मा. न्यायालयाचे आदेशाने तक्रारदार यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे. तक्रारदार यांना प्रतिकात्मक चेक देण्यात आलेला आहे.**

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- **Telegram Channel, facebook,Instagram** अथवा **Watsapp** वर जास्त परतावा देणा-या **Promotional Adds** वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.
- अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये **Telegram Channel, Watsapp Group** वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे **Sceenshot, Massages** दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.

- **Work From Home नावाखाली Online Youtube Vedio Link Task, Hotel/Movie Rating या सारख्या गुंतवणुक करणा-या फसव्या जाहिरातींना बळी पडु नये.**
- **जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.**
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.**
- **कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करुन नये.**
- **ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 व 1945 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

- सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, सफौ/फर्नांडिस, पोअं/शुभम कांबळे,पोअं/सावन शेवाळे, पोअं/ओंकार डोंगरे, मसुब/सोमनाथ बोरकर यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- [www.cybercrime.gov.in](http://www.cybercrime.gov.in)**




----0000----